नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

**दिनांक ३०/०६/२०२५ (सोमवार)**

---

## डायल ११२ वरील कॉलची गांर्भीयाने दखल घेत मौदा पोलीसांनी एका ईसमाचे प्राण वाचविले.

दिनांक ३०/०६/२०२५ रोजी मौदा पोलीस स्टेशनचे पोलीस अंमलदार शुभम ईश्वरकर आणि चालक पोलीस अंमलदार ललीतकुमार ठाकुर हे डायल ११२ डयुटीवर हजर असतांना डायल ११२ वर एक कॉल आला की, एक ईसम नामे पंकज राजेन्द्र खोब्रागडे हा भंडारा रोड वरील माथणी पुल येथे आत्महत्या करीत आहे. त्यावेळी हजर असलेले दिवस पाळी अधिकारी पोहवा देवेंद्र भुरे आणि सहकर्मी पोलीस अंमलदार अतुल निंबार्ते यांनी तात्काळ सदर माहीती मौदा पोलीस स्टेशनचे प्रभारी अधिकारी पोलीस निरीक्षक श्री सारिन दुर्गे यांना दिली. दिवस पाळी अधिकारी, डायल ११२ चे अंमलदार असे सर्व तात्काळ घटनास्थळी रवाना झाले. मौदा पोलीसांनी माथणी अस्तविसर्जन घाट येथे पोहचुन स्थानिक गोताखोर यांच्या मदतीने नदीच्या काठावर शोधमोहीम सुरु केली असता माथणी मोठा पुलीया खाली नदिच्या मधोमध असलेल्या दगडावरून कोणी तरी नदीच्या पात्रात पडल्या सारखामोठा आवाज आला तेव्हा पंकज खोब्रागडे यांनी नदीच्या वाहत्या प्रवाहात अचानकपणे उडी मारली होती पोलीसांनी जिवाची पर्वा न करता नदिच्या वाहत्या प्रवाहात उडी घेवुन सदर इसमास सुखरुप बाहेर काढले असता तो इसम पंकज राजेन्द्र खोब्रागडे, हा असल्याची खात्री पटली.

पंकज राजेन्द्र खोब्रागडे हा बेपत्ता असल्याने त्याची मिसींग पोलीस स्टेशन वाडी, नागपुर शहर येथे नोंद होती. दरम्यान पंकजने त्याच्या नातेवाईकांना तो माथणी पुल येथे आत्महत्या करीत असल्याबाबत फोन केल्याने त्याचे नातेवाईकांनी डायल ११२ ला कॉल करून सदरची माहीती मौदा पोलीसांना सांगितली. पंकज चे वडील नामे राजेंद्र खोब्रागडे हे वाडी पोलीस स्टेशन नागपुर येथील अंमलदार हे पोलीस मौदा पोलीस स्टेशनला हजर झाले. पंकजला त्याच्या वडीलांच्या ताब्यात देण्यात आले.




## रात्रगस्त दरम्यान कोबींग ऑपरेशन राबवुन केले रेकॉर्डवरील गुन्हेगार चेक आणि नाकाबंदी करून तपासली वाहने

दिनांक २९/०६/२०२५ रोजी श्रीमती वृष्टी जैन, सहा पोलीस अधिक्षक तथा उपविभागिय पोलीस अधिकारी यांची जिल्हा गस्त होती. जिल्हा गस्त दरम्यान श्रीमती वृष्टी जैन यांचे नेतृत्वात मंगळवारी पेठ, उमरेड येथे दिनांक २९/०६/२०२५ चे २३:०० वा. ते दिनांक ३०/०६/२०२५ चे ०५:०० वा. दरम्यान कोबींग ऑपरेशन राबविण्यात आले कोबींग ऑपरेशन राबविण्यात आले. सदर वेळी श्रीमती वृष्टी जैन यांच्या सह उपविभागिय कार्यलय,उमरेड येथील अंमलदार आणि दंगा नियत्रंण पथक चे पोलीस अंमलदार हजर होते. कोंबींग ऑपरेशन दरम्यान मंगळवारी पेठ, उमरेड येथे पायदळ पेट्रोलींग केली. तसेच रेकॉर्डवरील गुन्हेगार, जेल रिलीज गुन्हेगार, अवैध दारू विक्रेते गुन्हेगार चेक करून त्यांचे घराची पंचासमक्ष घरझडती घेण्यात आली आणि बायपास चौक , उमरेड येथे नाकाबंदी करण्यात आली. संशयीत वाहनांची तपासणी करण्यात आली .




GOODS
DHQ
CARRIER
BALAJI MALEGAON
TRANSPORT
K LEYLAND



## अंमलीपदर्थ बाळगुन त्याची विक्री करणाऱ्या आरोपी विरूध्द गुन्हा नोंद, आरोपी अटक, कळमेश्वर पोलीसांची कामगिरी

**पोलीस स्टेशन कळमेश्वर** :— दिनांक २९/०६/२०२५ रोजी कळमेश्वर पोलीसांना गुप्त बातमीदाराने खात्रीशीर माहीती दिली की, सुंदरसिंग बावरी, रा. वार्ड क्र. ३ वैशाली नगर, ब्राम्हणी, ता. कळमेश्वर, हा वैशाली नगर, ब्राम्हणी येथे त्याच्या घरात अंमली पदार्थ गांजा बाळगुन गांजाची विक्री करत आहे. मिळालेल्या माहीतीच्या आधारे पोलीसांनी घटनास्थळी जावुन पंचासमक्ष अरोपी नामे सुंदरसिंग महेद्रसिंग बावरी, वय २६ वर्ष, रा. वार्ड क्रं ३ वैशाली नगर, ब्राम्हणी, तह. कळमेश्वर याच्या घराची झडती घेतली असता, त्याचे घरात बेडरूम मधील बेडखाली लोखंडी पेटीमध्ये प्लास्टीकच्या पिशवीमध्ये लहान मोठे एकुण २२ पॅकेटमध्ये १२५ ग्रॅम गुंगीकारक वनस्पती ओलसर गांजा किंमती २२००/—

रुपये आणि वजन काटा किंमती २००/— रुपये **किंमती २,४००/— रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आला आहे.**

**सुंदरसिंग महेद्रसिंग बावरी, वय २६ वर्ष, रा. वार्ड क्र ३, वैशाली नगर, ब्राम्हणी, तह. कळमेश्वर, जि. नागपुर याच्या विरूध्द एन. डी. पी. एस. कायदयान्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे. आरोपीला अटक करण्यात आली आहे.**

## जनावरांची अवैधरित्या वाहतुक करणाऱ्या आरोपीतांविरूध्द गुन्हा नोंद
## ४ गोवंश जनावरांची सुटका

**पोलीस स्टेशन खापा** :— दिनांक २९/०६/२०२५ रोजी खापा पोलीसांना गुप्त बातमीदारांकडुन खात्रीशीर माहीती मिळाली की, अवैधरित्या जनावरांची वाहतुक केली जात आहे. मिळालेल्या माहीतीच्या आधारे पोलीसांनी जवाहर टी पॉईंट, खापा येथे जावुन महिन्द्रा पिकअप क्रं. एम. एच. ३१ इ. एन. ०८१२ या वाहनाची तपासणी केली. त्यात गोवंश जनावरे दिसली. वाहन चालक आणि त्याच्या साथीदाराला नाव पत्ता विचारले असता, चालक आरोपी नामे **१) निलेश सुरेशराव घाटोळे रा. मुर्ति नगर काटोल ता.काटोल आणि त्याचा साथीदार, २) सुधाकर शामराव सातपुते, वय ५४ वर्षे, रा. बुधवारपेठ काटोल, ता. काटोल अशी माहीती समजली.** वाहनातील जनावरांना कोणतीही चारापाण्याची सोय न करता त्यांची वाहतुक करीत असल्याचे दिसुन आले. आरोपीला जनावर खरेदी विक्री पावती तसेच जनावरे वाहतुक परावाना बाबत विचरणा केली असता त्याचे कडे कोणतेही कागदपत्रे नव्हती. **पोलीसांनी पंचासमक्ष घटनास्थळावरून** महिन्द्रा पिकअप क्रं. एम. एच. ३१ इ. एन. ०८१२ **किंमती ४,००,०००/— रूपये. आणि ४ गोवंश जनावरे किंमती ५५,००० /— रूपयाचा एकुण किंमती ४,५५,०००/— रूपयाचा मुददेमाल जप्त केला.**

**नमुद प्रकरणी चालक आरोपी १) निलेश सुरेशराव घाटोळे रा.मुर्ति नगर काटोल ता. काटोल आणि त्याचा साथीदार २) सुधाकर शामराव सातपुते रा.बुधवारपेठ काटोल ता. काटोल याच्या विरूध्द महाराष्ट्र पशु संरक्षण अधिनियम सहकलम प्राण्यांचा छळ अधिनियम सहकल ४९ भा.न्या.सं अन्वये गुन्हा नोंद केला आहे.**

## पोस्टे रामटेक हद्दीत सट्टापट्टी चालविणाऱ्या आरोपीतांविरूद्ध गुन्हा नोंद

## स्थानिक गुन्हे शाखा, नागपुर ग्रामीण यांची कामगिरी

**पोलीस स्टेशन खापरखेडाः—** दिनांक ३०/०६/२०२५ रोजी स्थानिक गुन्हे शाखेचे पथक पोलीस स्टेशन रामटेक हद्दीत पेट्रोलींग करीत असतांना गोपनीय माहिती मिळाली की, रामटेक येथील मटन मार्केट च्या मागे सार्वजनिक ठिकाणी आरोपी नामे आशिष अशोक गोसकुलवार हा पैसे घेवुन सट्टापट्टीचे आकडे लावुन हारजीतचा जुगार खेळत आहे. मिळालेल्या माहीतीच्या आधारे पोलीस घटनास्थळी पोहचले असता मटन मार्केट च्या मागे आरोपी नामे आशिष अशोक गोसकुलवार, वय ३६ वर्षे, रा. आझाद वार्ड , रामटेक हा कागदावर आकडे लिहुन सट्टीपट्टी चालवित असतांना मिळुन आला. पोलीसांनी पंचासमक्ष आरोपीच्या ताब्यातुन रोख रक्कम ५०२०/— रूपये आणि सट्टापट्टीचे लिहण्याकरीता वापरलेले साहीत्य असा **एकुण ५०२०/— रूपयांचा मुद्देमाल जप्त** करण्यात आला आहे.

**नमुद आरोपी आशिष अशोक गोसकुलवार, वय ३६ वर्षे, रा. आझाद वार्ड , रामटेक याच्या विरूद्ध पोलीस स्टेशन रामटेक येथे कलम १२ अ महाराष्ट्र जुगार अधिनियम अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.**

## पोलीस अधिक्षक कार्यालय नागपुर ग्रामीण, पोलीस भवन येथे सेवानिवृत्त अधिकारी व अंमलदार यांचा सत्कार समारंभ

दिनांक ३०/०६/२०२५ रोजी पोलीस अधिक्षक कार्यालय नागपुर ग्रामीण, पोलीस भवन येथे शासकीय सेवेतुन सेवानिवृत्त झालेल्या अधिकारी व अंमलदार यांचा सत्कार समारंभ नियोजीत करण्यात आला होता. सदर समारंभात श्री. रमेश धुमाळ, अपर पोलीस अधीक्षक, नागपुर जिल्हा ग्रामीण यांच्या हस्ते सेवानिवृत्त झालेले अधिकारी १. पोउपनि दिलीप पुसाराम बासोडे, नेमणूक नियंत्रण कक्ष,नागपुर ग्रामीण जिल्हा , २. पोउपनि गजानन दशरथ कंगाले, नेमणूक पोलीस स्टेशन काटोल ३. श्रेणी पोउपनि उत्तम कन्हैयालाल दास , नेमणूक मोटर परीवहन विभाग,नागपुर ग्रामीण जिल्हा ४. श्रेणी पोउपनि देवा लक्ष्मण नागोसे, नेमणूक पोलीस स्टेशन मैदा ५. श्रेणी पोउपनि

अशोक ओंकार धांडे, नेमणूक मोटर परीवहन विभाग,नागपुर ग्रामीण जिल्हा, ६.सहायक फौजदार ओंकार नथ्थुजी डाहारे, नेमणूक पोलीस स्टेशन कुही ७. सहायक फौजदार दिलीप घनश्याम सुर्यवंशी, नेमणूक पोलीस स्टेशन उमरेड , ८. सहायक फौजदार श्याम बिरबलदास महंत , नेमणूक नियंत्रण कक्ष,नागपुर ग्रामीण जिल्हा यांचा शाल, श्रीफळ आणि भेटवस्तू देवुन सत्कार करण्यात आला असुन श्री. रमेश धुमाळ, अपर पोलीस अधीक्षक, नागपुर जिल्हा ग्रामीण यांनी सेवानिवृत्त अधिकारी व अंमलदार यांना पुढील वाटचाली साठी शुभेच्छा दिल्या.

सदर कार्यक्रमात श्री. रमेश धुमाळ, अपर पोलीस अधीक्षक, नागपुर जिल्हा ग्रामीण, मानव संसाधन शाखेच्या पोलीस उपनिरीक्षक श्रीमती जोत्स्ना गिरी व मानव संसाधन शाखेचे अंमलदार हजर होते.



## अवैधरित्या गावठी मोहाफुल दारू काढणाऱ्या ३ आरोपीतांवर ३ गुन्हे नोंद,कळमेश्वर पोलीसांची कामगिरी

**पोलीस स्टेशन कळमेश्वर :—** दिनांक २९/०६/२०२५ रोजी कळमेश्वर पोलीसांना गुप्त बातमीदारांकडुन खात्रीशीर माहीती मिळाली की, मौजा पारधीबेडा, गोंडखैरी येथे अवैध रित्या मोहाफुल दारू काढली जात आहे. मिळालेल्या माहीतीच्या आधारे कळमेश्वर पोलीसांनी पारधीबेडा, गोंडखैरी येथे जावुन अवैध दारू बाबत खलील प्रमाणे कारवाई केली.

**कारवाई क्रं १ :—** महीला आरोपी हिचे ताब्यातुन २०० लिटर मोहाफुल सडवा किमती ७०००/— रूपये, ५० लिटर गावठी मोहाफुल दारू किंमती ५०००/— रूपये आणि प्लॉस्टिक ड्रम ६००/— रू. असा एकुण १२,६००/— रूपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे.

**कारवाई क्रं २ :—** महीला आरोपी  हिचे ताब्यातुन ४०० लिटर मोहाफुल सडवा किमती १४०००/— रूपये, ६० लिटर गावठी मोहाफुल दारू किंमती ६०००/— रूपये आणि इतर साहीत्य १२००/— रू.  असा एकुण २१,२००/— रूपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे.

**कारवाई क्रं ३ :—** महीला आरोपी  हिचे ताब्यातुन ४०० लिटर मोहाफुल सडवा किमती १४०००/— रूपये, ५० लिटर गावठी मोहाफुल दारू किंमती ५०००/— रूपये आणि इतर साहीत्य ११००/— रू.  असा एकुण २०,१००/— रूपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे.

वर नमुद तिन्ही कारवाईत एकुण **५३,९०० /—** रूपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

**नमुद तिन्ही महीला आरोपीतांवर कळमेश्वर पोलीस स्टेशन येथे  महाराष्ट्र दारूबंदी अधिनियमान्वये ३ गुन्हे नोंद केले आहे.**

**मा. पोलीस अधिक्षक**
**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**
**यांच्या मान्यतेने**